शासन मान्य
प्रयत्न आमचे, विश्वास तुमचा...
दारु सोडवा
हमखास!
सिगारेट / गुटखा / गांजा / मावा सोडवा
(न सांगता किंवा सांगून सोडवा)
जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र
डॉ.विलास पाठक : 8308113114, 9422240654
वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६
पत्ता: शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर अलीपुर रोड बार्शी

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १०१ वा | गुरुवार, दि. १४ नोव्हेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजूस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो. : ९५७९४२१४६५
८२७५२७४३५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# सत्तेचा गेम कुठं होणार चेंज..

## 10 जिल्हे बदलणार महाराष्ट्राच्या सत्तेची समीकरणं?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी मतदानाची तारीख जसजशी जवळ येत आहे तसतशी सर्वांचीच उत्सुकता ताणली जात आहेत. कारण या निवडणुकीत नेमकं काय होणार याचा कोणालाही अंदाज लावता येत नाहीए.

मात्र, असं असलं तरीही काही सर्व्हे आता समोर येत आहे. त्यापैकीच एका सर्व्हेची सध्या बरीच चर्चा सुरू आहे.

द महाराष्ट्र ॲनालिटीका या संस्थेने केलेल्या सर्व्हेतून महाराष्ट्रातील 10 महत्त्वाच्या जिल्ह्यातील सर्व्हे समोर आले आहेत. ज्यामध्ये या जिल्ह्यांमध्ये कोणत्या आघाडीला किती जागा मिळतील याचा थेट अंदाज वर्तवण्यात आला आहे.

पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील अनेक जिल्हे हे यंदा निवडणुकीचा संपूर्ण निकाल पालटू शकतात. त्यामुळे या विभागांमधील महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये जो सर्व्हे करण्यात आला त्याबाबत आम्ही आता आपल्याला नेमकी माहिती देणार आहोत.

**हे 10 जिल्हे बदलणार सत्तेची समीकरणं?**

**कोल्हापूर:** कोल्हापूर जिल्ह्यात एकूण 10 जागा असून त्यापैकी केवळ 2 जागा या महायुतीला तर महाविकास आघाडीला 7 आणि इतरांना



1 जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**सोलापूर:** सोलापूर जिल्ह्यात एकूण 11 जागा असून त्यापैकी महायुतीला 2 जागा आणि महाविकास आघाडीला 8 तर इतरांना 1 जागा मिळेल असं सर्व्हेत म्हटलंय.

**सांगली:** सांगली जिल्ह्यात एकूण 8 जागा असून त्यापैकी 2 जागा या महायुतीला तर महाविकास आघाडीला 6 जागा जिंकण्याचा अंदाज सर्व्हेत वर्तवण्यात आला आहे.

**पुणे:** पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक जागा या पुणे जिल्ह्यात आहेत. तब्बल 21 जागा जिल्ह्यात असून त्यापैकी महायुतीला 7 आणि महाविकास आघाडीला 14 जागा मिळतील असं म्हटलं आहे.

**धाराशिव:** धाराशिव (उस्मानाबाद) मधील एकूण 4 जागांपैकी चारही जागा या महाविकास आघाडीला मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे येथे महायुतीला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

**अहमदनगर:** अहमदनगर जिल्ह्यात एकूण 12 जागा असून त्यापैकी केवळ 3 जागा या महायुतीला तर महाविकास आघाडीला 9 जागा जिंकण्याची **शक्यता वर्तवली आहे..**

**सातारा:** सातारा जिल्ह्यातील एकूण 8 जागांपैकी महायुतीला 5 तर महाविकास आघाडीला 3 जागा जिंकेल असं सर्व्हेत म्हटलं आहे.

**बीड:** मराठा आंदोलनामुळे बीड जिल्ह्यातील राजकारण हे सध्या घुसळून निघतंय. अशावेळी येथील 6 जागा केवळ 2 जागा या महायुतीला तर महाविकास आघाडीला 4 जिंकण्याचा अंदाज बांधण्यात आला आहे.

**जालना:** बीडप्रमाणे जालना जिल्हा देखील मराठा आरक्षणाचा केंद्रबिंदू बनलाय. ज्यामुळे त्याचा सर्वाधिक फटका हा या जिल्ह्यात महायुतीला बसू शकतो. कारण येथे एकही जागा महायुतीला जिंकता येणार नाही असं द महाराष्ट्र ॲनालिटीकाच्या सर्व्हेत म्हटलं आहे. येथील सगळ्या म्हणजे 5 जागा या मविआला मिळण्याची शक्यता आहे.

**लातूर:** लातूर जिल्ह्यात दोन्ही आघाड्यांना समसमान जागा मिळतील असा अंदाज आहे. इथे एकूण 6 जागा आहेत ज्यापैकी प्रत्येकी 3-3 जागा या महायुती आणि महाविकास आघाडीला मिळू शकतात.

पश्चिम महाराष्ट्रात 70 पैकी तब्बल 48 जागा या महाविकास आघाडी आणि केवळ 20 जागा या महायुती जिंकतील असाही अंदाज यावेळी वर्तविण्यात आला आहे.

## अखेर दिलीप माने उतरले सोलापूर दक्षिणच्या मैदानात !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कॉंग्रेसचे बी फार्म न मिळाल्याने नाराज झालेले माजी आमदार दिलीप माने यांनी माघार घेतली होती पण त्यांनी कोणताही राजकीय निर्णय घेतला नाही दरम्यानच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत ते भारतीय जनता पार्टीत प्रवेश करणार अशी जोरदार चर्चा झाली.

शेवटी दिलीप माने यांनी दक्षिण सोलापूर विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारी सकाळी एक व्हिडिओ समोर आला. त्या व्हिडिओमध्ये दिलीप माने हे अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांचा प्रचारात सहभागी झाल्याचे पाहायला मिळाले.



नंदुरपासून दिलीप माने यांच्या उपस्थितीत काडादी यांच्या प्रचार दौऱ्याला सुरुवात झाली आहे. दिलीप माने हे काडादी यांच्या प्रचारासाठी उतरले असल्याने निश्चितच काडादी यांची ताकद वाढली आहे. दिलीप माने यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे.

त्यांची संपूर्ण मतदार संघात बांधणी आहे. शहरी भागात कार्यकर्त्यांचे मोठी ताकद आहे. ही सर्व ताकद आता काडादी यांना मिळणार आहे.

## मोहोळ तालुक्याचं नंदनवन करणार-आ.यशंवत माने
### राजन पाटलांसह अनेक नेतेमंडळींची हजेरी

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** विरोधकांकडे विकासाचा एकही मुद्दा बोलायला नाही. राजकारण हे विकासाचं, तथा विचारचं असावं किंवा द्वेषाच नसावं, असे मोहोळ विधानसभेचे महायुतीचे उमेदवार आ.यशवंत माने यांनी सांगतानाच, या तालुक्याच्या चौफेर विकासासाठी आपण कटिबद्ध असून तालुक्याचं नंदनवन करण्यासाठी पुन्हा एकदा आपणास संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी तालुक्यात अनेक ठिकाणी आयोजित प्रचार सभांमध्ये केले.मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आ.यशवंत माने यांच्या प्रचारार्थ, मलिकपेठ,घाटणे आढेगाव सौंदणे, तांबोळे व पोखरापूर येथे माजी आ. राजन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उमेदवार आ. यशवंत माने प्रमुख उपस्थितीत प्रचार सभा झाल्या त्यावेळी आ.माने बोलत




होते.यावेळी माने पुढे म्हणाले, मोहोळ मतदार संघामध्ये मी नवखा उमेदवार म्हणून जेव्हा आ. राजन पाटील यांनी मला मतदारसंघांमध्ये संधी दिली त्या संधीचे मी सोने करत त्यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोळ तालुक्याचा तसेच मतदार संघाचा अभ्यास करून विविध गावांमध्ये सर्व समान विकास निधीचा मी समान वाटप केले असून आजपर्यंत साडेतीन हजार कोटीचा विकास निधी आणल्याचा मला खूप आनंद आहे.

आजपर्यंत तालुक्यातील रस्त्यांची समस्या असो, गटारची समस्या असो, शेतीच्या पाण्याची समस्या असो तसेच मोहोळ शहराच्या पिण्याच्या पाण्याची सुविधा असो विजेची अडचण असो ती सुद्धा आपण दूर केली असून तालुक्यांमध्ये अनेक ठिकाणी सबस्टेशन नव्याने निर्माण करण्यात आले तसेच स्पर्धा परीक्षांच्यासाठी स्पर्धा परीक्षा केंद्र खेळाडूंसाठी क्रीडा संकुल उपजिल्हा रुग्णालय या सर्व गोष्टींचे आपण पूर्तता केलेली आहे, असे शेवटी त्यांनी सांगितले.

यावेळी प्रकाश चवरे, दादा पवार, संजीव खिलारे, बाळासाहेब भोसले, संतोष जाधव, सिंधू वाघमारे, सुरेखा बाबर, चंद्रहार चव्हाण, नरोटे बाळासाहेब पाटील, आढेगावचे नानासाहेब डोंगरे, रमेश डोंगरे, प्रविण डोंगरे, विठ्ठल डोंगरे, विकास डोंगरे सौंदणेचे भारत सुतकर, विकास कोकाटे,सचिन भानवसे, शिवाजी सोनवणे सर,माऊली चव्हाण, शिवाजी चव्हाण. तांबोळेचे विजय कोकाटे, संभाजी कोकाटे, पोपट हांडे,रावसाहेब नागणे, तानाजी नागणे, सागर पवार, रमेश फाटे, पोखरापूरचे यशवंत नरोटे सोमादेव वाघमोडे, बालजी नरुटे, दत्तात्रय काकडे, हर्षद दळवे, सिध्दराम नरुटे, सिंधू वाघमारे, धोंडिराम लेंगरे, रामकुमार दळवे,राजूदेव वाघमोडे, चंदूदेव वाघमोडे, शंकर देव वाघमोडे, दादाराव वाघमोडे, बापू लेंगरे, मधू वाघमोडे, अंकुश दळवी यांच्यासह सर्व घटक पक्षातील प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## अक्कलकोटच्या विकासासाठी भाजप-महायुतीला भरघोस मतांनी विजयी करा- सचिन कल्याणशेट्टी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील सुलेरजवळगे येथे महायुतीचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागरिकांशी संवाद साधत विविध विषयांवर चर्चा केली. भाजप-महायुतीला भरघोस मतांनी विजयी करावे असे आवाहन नागरिकांना केले.रामचंद्र अरवत यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह या वेळेला भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करण्यात आला.




सुलेरजवळगे या गावात संत रोहिदास नगर येथे पेपर ब्लॉक बसवणे, गावांतर्गत सिमेंट रस्ता, श्री बिरगेश्वर मंदिर, कमलेश्वर मंदिर, वल्ली साहेब दर्गा यांसमोर सभामंडप बांधकाम, जिल्हा परिषद शाळा दुरुस्ती, जिल्हा परिषद शाळा वर्ग खोली 1 बांधकाम, नवीन अंगणवाडी क्र.128 बांधकाम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधकाम, सांभार वस्ती येथे रस्ता खडीकरण, दलित वस्ती येथे समाज मंदिर बांधकाम, तडवळ ते सुलेर जवळगे रस्ता, सुलेरजवळगे ते पान मंगळूर- देवी कवठे रस्ता, सुलेरजवळगे ते केगाव- मुंढेवाडी रस्ता, सुलेर जवळगे- तडवळ- अंकलगे रस्ता, चिंचोळी ते सुलेरजवळगे रस्ता सुधारणा, सुलेरजवळगे मंगळूर ते देवी कवटे मध्ये रस्ता सुधारणा, कमलेश्वर मंदिर सुशोभीकरण, सुलेरजवळगे ते करजगी मध्ये रस्ता सुधारणा, जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा सोय अशी कामे झाली आहेत.

त्याचप्रमाणे शिलवंती मंदिरासमोर सभा मंडप बांधकाम, धनगर समाज वस्ती येथे सभागृह बांधकाम, जिल्हा परिषद शाळा दुरुस्ती, जिल्हा परिषद मराठी शाळा वर्ग खोली.1 बांधकाम अशा कामांना मंजुरी मिळालेली आहे.

यावेळी परमेश्वर यादवड, सुरेश अर्जुन, लक्ष्मण वाघमारे, सुरेश गड्डी, अविनाश मडीखांबे, अण्णू याबाजी, सुरेश सद्दलगी, डॉ. हिप्पर्गी, अंबादास देवकते, नागू पाटील, रवी बगले, दयानंद उंबरजे, महादेव मुडवे, अजिज सुतार, विक्की ईश्वरकट्टी, अनिल पाटील, शिवलिंगप्पा अरवर, केंचप्पा पुजारी, गौडप्पा बिराजदार, शिवानंद मानशेट्टी, भाजप-महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपला धक्का; माजी आमदार शिवशरण पाटील ठाकरेंच्या गटात

**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** निवडणूक जाहीर होताच तिकीट वाटपासाठी किंवा नंतर अनेक नेत्यांची पक्षांतरे पहायला मिळत होती. परंतू, मतदानाला काही मोजके दिवस शिल्लक असताना देखील नेत्यांची पक्षांतरे सुरुच आहेत. दक्षिण सोलापूरचे माजी आमदार आणि भाजप नेते शिवशरण बिराजदार पाटील यांनी ठाकरे गटात प्रवेश केला आहे.

पाटील यांचा अचानक ठाकरे गटात प्रवेश करणे हा भाजपचे आमदार सुभाष देशमुख यांना मोठा धक्का आहे. पाटील हे दक्षिण सोलापूरचे माजी आमदार आणि लिंगायत समाजाचे मोठे नेते आहेत. दक्षिण सोलापूरमध्ये लिंगायत समाजाचे वर्चस्व असल्याने देशमुख यांना याचा निवडणुकीत फटका बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत पाटील यांनी शिवबंधन बांधले. यावेळी प्रतिक्रिया देताना पाटील म्हणाले की, भाजपात गेलो ती माझी वाट चुकली. सोलापूरचे दोन्ही आमदार काही कामाचे नाहीत. सोलापूरला भकास केले. दोन्ही देशमुखांच्या भांडणात सोलापूर भकास झाले. स्वतः च मंगल म्हणजे लोकमंगल, तंबाकू घ्यायचा आणि चुना लावायचा हेच काम या लोकांनी केले, अशी टीका पाटील यांनी केली.

दक्षिण सोलापुरात शिवसेनेचा आमदार करायला मी इथे आलो आहे. शिवसेनेचा आमदार झाला म्हणजे आमच्या कुटुंबातला आमदार झाला. फडणवीस यांनी मला पद देतो म्हणाले होते, मात्र त्यावेळी परिस्थिती वेगळी होती. आता बचेंगे तो और भी लडेंगे, एका समाजावर आमदार कोणी होत नाही, त्याला कष्ट करावे लागतात आणि घाम गाळावा लागतो, असे शिवशरण पाटील म्हणाले.

## कारखानदार विरुद्ध नोकरदार अशी ही निवडणूक
### महादेव कोगनुरे : मनसेच्या पदयात्रेला नीलम नगरात जोरदार प्रतिसाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर मतदारसंघातील सामान्य मतदारांना हे माहिती आहे की महादेव कोगनुरे हा जनसेवक आहे. प्रामाणिक आहे. धनाढ्य कारखानदार नाही. त्यामुळे सामान्य जनता माझ्या पाठीशी आहे. त्यामुळे माझा विजय निश्चित आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार महादेव कोगनुरे यांनी केले.

सोलापूर शहरात ठिकठिकाणी निघालेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदयात्रेला आज पदाधिकारी कार्यकर्ते आणि सामान्य



मतदारांनी जोरदार प्रतिसाद दिला.

सकाळी आठ ते दुपारी एकपर्यंत आकाशवाणी केंद्र, जगदंबा देवी मंदिर, भावताऋषी नगर, ज्योती नगर, जाधव पिठाची गिरणी, शरणबसवेश्वर नगर, भाग्यश्री नगर, गवळी वस्ती, बनशंकरी बोळ, गंगा चौक, नवदुर्गा मंदिर, नीलम नगर, गणेश मंदिर, करली चौक, थोबडे बस स्टॉप, महांतेश्वर मंदिर, मार्कंडेय चौक, शिवशरण मठ, मोनेश्वर शाळेकडून डावीकडे जमादार वस्ती, तक्का वस्ती, विजयनगर आदी भागात पदयात्रा निघाली.

हातात मनसेचे झेंडे, गळ्यात पटके घालून ज्येष्ठ नागरिक, तरुण, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. 'आवाज कुणाचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा', 'महादेव कोगनुरे यांचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सामान्य मतदारांनीही आतषबाजी करून पुष्पगुच्छ देऊन पुष्पहार घालून कोगनुरे यांचे स्वागत केले.

**भाजपच्या गडात मनसेची हवा**

नीलम नगर गणेश मंदिर परिसर भारतीय जनता पक्षाचा गड मानला जातो त्या भागातही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महादेव कोगनुरे यांना जोरदार प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी अनेक महिलांनी यांची औक्षण करून आशीर्वाद दिले. पदयात्रेत माता-भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

**पारंपरिक वाद्यांचा गजर**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या या पदयात्रेचे वेगळेपण म्हणजे तुतारीसह ढोल ताशे अशा पारंपरिक वाद्यांच्या गजरात ही पदयात्रा निघाली. शिस्तीत आणि उत्साहात निघालेल्या या पदयात्रेचे दक्षिण सोलापूर मतदारसंघातील मतदारांनी कौतुक केले.

## हुतात्मा एक्स्प्रेसला जोडले जाणार तीन जनरल डबे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर-पुणे रेल्वे मार्गावर प्रवास करणाऱ्या सोलापूरकर प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. ती म्हणजे हुतात्मा एक्स्प्रेसमधून रिझर्व्हेशन न करता ऐनवेळी जनरल तिकीट काढून प्रवास करता येणार आहे.

तीन आरक्षित डब्यात बदल करून त्याऐवजी तीन डबे जनरल असतील. यातून सर्वसामान्य २३५ प्रवाशांना अनारक्षित (जनरल) तिकिटावर प्रवास करता येणार आहे. येत्या २१ नोव्हेंबरपासून सोलापूर-पुणे-सोलापूर हुतात्मा एक्स्प्रेसला हा निर्णय लागू होणार असून, सोलापूरहून पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

कोरोनाकाळात रेल्वेने मेल एक्स्प्रेस गाड्यांतील साधारण डब्याची संख्या एक आणि दोन करण्यात आलेली होती. तसेच हुतात्माला जनरल डबा नसल्यामुळे वेटींग तिकीट असलेल्या आणि अचानक प्रवास करणाऱ्या प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत होता. पण, जनरल डबे घोषित केल्यामुळे दिलासा मिळाला आहे.

गेल्या दोन ते तीन वर्षांपासून हुतात्मा एक्स्प्रेला साधारण डब्यांची संख्या वाढवण्यासाठी सातत्याने मागणी होत होती. अखेर ती मागणी रेल्वे प्रशासनाने पूर्ण केली आहे.

## सर्वांगीण विकासासाठी भाजपला साथ द्या - आ. सुभाष देशमुख

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महायुती सरकारने घेतलेल्या निर्णयांपैकी शेतकरी वीज बिल माफ, लाडकी बहीण योजनेचा सोलापूर दक्षिण मतदारसंघातील हजारो लोकांना फायदा झाला आहे. महायुती सरकार सर्वसामान्य जनतेचे सरकार आहे.

त्यामुळे महायुतीला मतदान करून तालुक्यासह महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला साथ द्यावी, असे आवाहन भाजपचे उमेदवार



आ. सुभाष देशमुख यांनी केले.

आ. देशमुख यांनी रविवारी टाकळी, बरूर, बोळकवठे, संजवाड, होनमुर्गी आदी गावांना प्रचारार्थ भेट दिली. यावेळी ग्रामस्थांनी आ. देशमुख यांचे स्वागत केले. महिलांना लाडकी बहीण योजना सुरू केल्यामुळे आम्हाला उद्योग, व्यवसायाला हातभार लागत असल्याचे सांगितले.

आ. देशमुख म्हणाले की, मागिल 25 वर्षांत जेवढा विकास झाला नाही, तेवढा विकास या 10 वर्षाच्या कार्यकाळात झाला आहे.

होटगी पर्यटन केंद्रासाठी 5 कोटींचा निधी, होटगी आश्रमशाळा आणि वसती गृह बांधण्यासाठी 32 कोटी, हत्तरसंग कुडल देवस्थानसाठी 13 कोटी, नांदणी वन व उद्योग केंद्रासाठी 3 कोटी, हिरज रेशीम बाजारपेठेसाठी साडेसात कोटी, वडापूर बॅरेजसाठी 67 कोटी निधी मिळाला आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दक्षिण तालुक्याला भरभरून निधी दिला आहे. आगामी काळातही यापेक्षा जास्त निधी तालुक्यात आणार आहे. त्यासाठी पुन्हा एकदा मला निवडणून द्या.

## संपादकीय

# विद्यार्थ्यांचा आक्रोश

उत्तर प्रदेशात विद्यार्थ्यांचे आंदोलन खूपच आक्रमक झालेले पाहायला मिळत आहे. प्रयागराज येथील लोकसेवा आयोग कार्यालयाच्या बाहेर हजारोंच्या संख्येने विद्यार्थी जमले आहेत. काल पहिल्यांदा अचानकपणे हे विद्यार्थी चारही बाजूंनी आले आणि त्यांनी लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाला घेराव घातला. पोलिसी बळाचा वापर करून काल त्यांना पांगवण्यात सरकारला यश आले असले तरी, आज लागोपाठ दुर्सया दिवशी पुन्हा आदल्या दिवशीपेक्षा अधिक संख्येने विद्यार्थी तेथे जमले आहेत. विद्यार्थ्यांची मागणी अत्यंत रास्त आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, लोकसेवा आयोगाची परीक्षा एकाच दिवशी घ्यावी, सगळीकडे एकच प्रश्नपत्रिका असावी आणि प्रश्नपत्रिका बिनचूक असावी अशा त्यांच्या मूलभूत मागण्या आहेत. या मागण्या मान्य न करण्याइतक्या गंभीर नाहीत, तरीही लोकसेवा आयोग त्यांचे समाधान करू शकत नाही. दोन-अडीचशे पदांसाठी उत्तर प्रदेशात लाखो विद्यार्थी परीक्षा देतात. या परीक्षा वेगवेगळ्या टप्प्यात घेतल्या जातात. या परीक्षा घेण्यामागे पारदर्शकता आणणे असा आमचा हेतू आहे, असे लोकसेवा आयोगाचे म्हणणे आहे. पण ते विद्यार्थ्यांना मान्य नाही. या परीक्षांमध्ये घोटाळे होतात, घोटाळे करण्यासाठीच ही तरतूद झाली आहे, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे पडते. पूर्वी या सगळ्या परीक्षा एकाच टप्प्यात, एकाच दिवशी घेतल्या जात असत. तीच पद्धत पुन्हा लागू करावी अशी जर विद्यार्थ्यांची मागणी असेल तर त्यात काही गैर आहे, असे वाटत नाही. आज प्रत्यक्ष आंदोलन स्थळावरील विद्यार्थ्यांची दृश्य पाहिल्यानंतर, बरेच दिवस दबलेला हा आवाज त्या रस्त्यावर उमटलेला दिसला. हातात सापडेल त्या वस्तू घेऊन त्यावर लाकडी दंडुके आपटून विद्यार्थी आपला निषेध नोंदवत आहेत. आज त्यातल्या त्यात सुदैवाचा भाग असा की, या विद्यार्थ्यांना मोकळेपणाने आंदोलन करू दिले गेले. त्याचे मुख्य कारण असे असावे की, विद्यार्थ्यांच्या संतापाच्या लाटाच इतक्या आक्रमक होत्या की, त्यावर सरकार आणि पोलीस यंत्रणा हतबल झालेली दिसली. सध्या हे आंदोलन अलाहाबाद म्हणजेच प्रयागराजमध्ये एकवटले असले, तरी त्याची धग उत्तर प्रदेशच्या अन्य भागांमध्ये उमटल्याशिवाय राहणार नाही. उत्तर प्रदेश हे देशातले सर्वात मोठे राज्य असले तरी येथील शिक्षित आणि अशिक्षित लोकांना रोजगारासाठी देशाच्या अन्य भागात धाव घ्यावी लागते. आज देशाच्या अन्य भागात उत्तर प्रदेशातील अक्षरशः लाखो लोक नरकयातना सहन करत कसाबसा रोजगार कमावताना दिसतात. सरकारी नोकरी मिळणे हा विद्यार्थ्यांचा हक्क आहे. त्यासाठी घेतल्या जार्णाया परीक्षा अत्यंत काटेकोर पद्धतीने घेतल्या गेल्या पाहिजेत, त्यात भ्रष्टाचार आणि अन्य गैरप्रकाराला थारा असता कामा नये ही इतकी साधी मागणीसुद्धा या देशात मान्य होत नसेल, तर युवकांचे भवितव्य काय असेल याचा विचारच न केलेला बरा. परीक्षा वेळेवर घ्या, वेळेवर निकाल लावा आणि पारदर्शी पद्धतीने भरती करा, या मागणीच्या पूर्ततेसाठी फार कसरत करावी लागते असे नाही.पण उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री यावर काहीही भाष्य करताना दिसत नाहीत. ते सध्या विधानसभा निवडणुकांच्या प्रचारात व्यस्त आहेत. त्यांनी 'बटेंगे तो कटेंगे' हा एकच अजेंडा देशभर राबवणे सुरू केला आहे. या प्रचारी मुद्द्यांचा फोलपणा लगेच लक्षात येण्यासारखा आहे. भाजपची ही सत्ताधारी मंडळी फक्त निवडणूक जिंकण्याच्या मागे हात धुऊन लागलेली दिसतात, पण जेथे त्यांच्या हातात सत्ता आहे तेथील जनतेचे समाधान करणे किंवा प्रश्न सोडवणे त्यांचेच काम आहे. बेरोजगारीचा दर गेल्या पन्नास वर्षांच्या विक्रमी पातळीवर गेला आहे. उत्तर प्रदेशातही हीच परिस्थिती तेथील युवक अनुभवत आहेत. आज त्यांना तेथे सरकारी नोकरीत संधी नाही, उत्तर प्रदेशात खासगी उद्योग मोठ्या प्रमाणावर येत नाहीत त्यामुळे तेथेही त्यांच्या नोकरीची सोय होत नाही, मग हा युवक किती दिवस मानसिक कोंडमारा सहन करणार, हा प्रश्न आहे. आता हा युवक आक्रमकपणे बाहेर आला आहे, तो सरकारच्या विरोधात आक्रमक भाषा वापरतो आहे, त्या मागची त्यांची कळकळ सरकारने लक्षात घेण्याऐवजी या आंदोलनाला राजकीय पाठबळ असल्याचा दावा सत्ताधारी करू लागले आहेत. म्हणजे त्यांना या आंदोलनातही राजकारण दिसते आहे. आणि विरोधकांनी फूस लावल्यामुळे हे युवक रस्त्यावर उतरले आहेत असे सांगायला त्यांनी आता सुरुवात केली आहे. उत्तर प्रदेशच्या सत्ताधार्यांनी असे म्हणणे म्हणजे या आंदोलनकारी युवकांची क्रूर चेष्टाच आहे. या प्रामाणिक आंदोलनाला आणि आक्रोशाला विरोधकांच्या राजकारणाचा भाग समजून त्याकडे दुर्लक्षित करून सरकार विद्यार्थ्यांचा संताप आणि आक्रोश आणखीनच वाढवत आहे हे त्यांनी लक्षात घेतलेले बरे. या आंदोलनाची धग पुढे किती वाढत जाईल याचा अंदाज अजून योगी सरकारला आलेला दिसत नाही. शेजारच्या बांगलादेशात विद्यार्थी आणि युवकांनीच आंदोलन करून तेथील सरकारला पायउतार व्हायला भाग पाडले होते.जेव्हा सामाजिक परिस्थिती खर्या अथार्ने बिघडते त्यावेळी प्रत्येक ठिकाणचा युवकच रस्त्यावर उतरलेला दिसतो आणि त्यातूनच सत्ताधार्यांची सिंहासने अनेक वेळा उलथवली गेली आहेत. त्यामुळे हे आंदोलन योगी सरकारने गांभीयार्ने घ्यायला हवे.

योगींनी आता निवडणूक प्रचार दौरे थोडे कमी करून या युवकांशी थेट चर्चा करण्याची गरज आहे. पण मोदी किंवा योगी यांच्या नेतृत्वाखालील सरकारांचे आजपर्यंत हेच वैशिष्ट्य राहिले आहे की, त्यांनी कोणत्याही आंदोलनाची कधी गांभीयार्ने दखलच घेतलेली नाही. विद्यार्थ्यांवर पोलिसी बळाचा वापर केला की विद्यार्थी घरी निघून जातील आणि आंदोलन आपोआप शमेल अशा भ्रमात हे सरकार राहिले. पण काल पोलिसीबळानंतर पांगले गेलेले प्रयागराजमधील विद्यार्थी आज तेथे दुप्पट संख्येने जमले आहेत. ते पाहता आता योगी सरकारला त्यांच्या मागण्या मान्य करण्याखेरीज तरणोपाय राहिलेला दिसत नाही.

प्रबोधन

# थोर व्यक्ती विषयक
# थोर सेवाभावी । लोकांचा दुःखहर्ता

जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, वल्लभभाई पटेल, विनोबा भावे या थोर व्यक्तींना नररत्नं म्हटलं जातं आणि या नररत्नांची खाण म्हणून महात्मा गांधीजींना श्रेय देणं अपरिहार्य ठरतं. वल्लभभाई आणि जवाहरलाल नेहरू हे तर महात्माजींचे राजकीय वारस म्हणून मान्यता पावल्याने भारत स्वतंत्र झाल्यावर नेहरू प्रधानमंत्री झाले आणि उपप्रधानमंत्री वल्लभभाई पटेल झाले.

३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातमधील करमसद या गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले वल्लभभाई अखिल भारतीय पातळीवरील नेतेपदी आरूढ झाले, ते त्यांच्या अंगी असलेल्या संस्कारशील गुणवत्ता आणि बुद्धिमत्तेमुळे! उद्यमशीलता, परोपकारी भावना, अथक प्रयत्नशीलता आणि नियोजनपूर्वक काम करणारे वल्लभभाई, महात्माजींना आपला मार्गदर्शक आणि गुरू मानायचे. १९२८चा बाडोर्लीचा सत्याग्रह यशस्वी केल्याबद्दल शेतकऱ्यांच्या वतीने त्यांना देण्यात आलेल्या मानपत्राविषयी कृतज्ञता व्यक्त करताना म्हटलं, 'गांधीजींचा पट्टशिष्य होण्याइतकी माझी योग्यता नाही. ती प्राप्त करून घेण्यासाठी मला अनेक जन्म घ्यावे लागतील. या लढ्याच्या यशाचं श्रेय गांधीजींना आहे.' अशा विनम्र, निरपेक्ष, कृतज्ञपणामुळेच वल्लभभाई थोर महापुरुष झाले. १९१२ मध्ये बॅरिस्टर होऊन इंग्लंडहून येऊन अहमदाबाद येथे यशस्वी वकील म्हणून नाव कमावलेल्या वल्लभभाई यांची गोध्रा येथे १९१७मध्ये महात्मा गांधींनी घेतलेल्या राजकीय परिषदेत गांधीजींशी ओळख झाली. महात्माजींचा साधेपणा, सरळ स्वभाव, सेवावृत्ती, देशप्रेम या गुणांचा वल्लभभाईंच्या मनावर इतका प्रभाव पडला की, त्यांनी गांधीजींप्रमाणेच साधेपणाने देशकायार्ला तन-मन अर्पण करून आपल्या शेतकरी बंधूंना सर्वतोपरी मदत करण्यास प्रारंभ केला. त्यावर्षी खेडा जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झालं होतं. वल्लभभाई आणि गोकुळदास पारीख यांनी सरकारकडे शेतकऱ्यांना शेतसारा माफ करण्याची मागणी केली. वल्लभभाईंनी सहाशे पैकी चारशे गावांचा अभ्यासदौरा केला. या सत्याग्रहाने गांधीजी आणि वल्लभभाईंच्या महान भागीदारीचा प्रारंभ झाला. वल्लभभाई यांच्या कणखर स्वभावाचा महात्माजींना प्रत्यय आला आणि त्यांनी वल्लभभाईंना आपला विश्वासू सहकारी मानलं. त्याच वर्षी अहमदाबाद नगरपालिकेची निवडणूक लढवून वल्लभभाईंनी विजय मिळवला. त्यावेळी नगरपालिकेतील इंग्रज अधिकाऱ्यांचं वर्चस्व लोकांना त्रासदायक ठरत होतं. वल्लभभाईंनी इंग्रजांचं राज्य असताना इंग्रज अधिकाऱ्यांना काढून टाकण्याचं काम व्यवस्थितपणे करून त्यांच्या जाचातून लोकांना मुक्त केलं. हा त्यांचा नैतिक विजय स्पृहणीय आहे.

त्यावेळी इंग्रज अधिकारी गरीब शेतकरी लोकांना वेठबिगार पद्धतीने फुकट राबवून घेत, मार देत, छळ करीत. गांधीजींनी या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. वल्लभभाई आणि अन्य नेत्यांनी महात्माजींना साथ देऊन हा लढा सर्वव्यापी बनवला. त्यामुळे इंग्रजांनी घाबरून जाऊन वेठबिगारीची जुलमी पद्धत बंद केली. असाच एक सत्याग्रह बोरसदच्या शेतसाऱ्याविरुद्ध वल्लभभाईंनी लढवला. सत्याग्रह आणि सरकारी नोकरांवरील बहिष्कारामुळे इंग्रजांना नमतं घ्यावं लागलं. ज्यांना शक्य असेल त्यांनी शेतसारा भरावा, असा आदेश सरकारने काढला. १९२८ मध्ये इंग्रज सरकारने बाडोर्ली तालुक्याचा शेतसारा ३० टक्के वाढवला. या अन्यायाविरुद्ध लढणं आवश्यक होतं. वल्लभभाई यांनी सत्याग्रह सुरू केला. इंग्रजांनी जुलूम सुरू केला. लोक चिडले. विधायक शक्तीवर विश्वास ठेवणारे वल्लभभाई लोकांना म्हणाले, 'मित्र हो, सध्या सरकार फार गरम झालं आहे. आपण मात्र थंड राहिलं पाहिजे. लोखंड तापलं तरी त्यावर मारायचा घण थंडच पाहिजे; नाहीतर हात जळतील. तुम्ही तुमचं डोकं शांत ठेवा. संयम सोडू नका.' हा लढा यशस्वी झाला. मधु लिमये लिहितात, 'बाडोर्ली लढ्यानंतर वल्लभभाईंना लोकांनी उत्स्फूर्तपणे सरदार ही पदवी दिली.' जनता पुराने त्रस्त होवो की साथीच्या रोगांनी, जनतेचा हा सरदार त्यांना संकटमुक्त करण्यासाठी अहोरात्र झुंजत राहायचा. १९३४पासून कॉंग्रेसची सूत्रं वल्लभभाई पटेल यांच्या हाती होती आणि त्यांनी ती यशस्वीपणे हाताळली. १९४२च्या चले जाव चळवळीत वल्लभभाई आघाडीवर होते. १९४७ला स्वातंत्र्य मिळाल्यावर वल्लभभाईंनी भारतातील ७०० संस्थानांचं विलीनीकरण ज्या खंबीरपणे घडवून आणलं, तो त्यांच्या नेतृत्वातील एक तेजस्वी पैलू होता. म्हणूनच जवाहरलाल नेहरूंनी गौरवोद्गार काढले, 'वल्लभभाई म्हणजे मंत्रिमंडळाचा सर्वात खंबीर आधारस्तंभ आहेत.'

महादेवशास्त्री जोशी लिहितात, 'भारतीय संघराज्यात संस्थानं विलीन झाल्यामुळे भारत खऱ्या अथार्ने स्वतंत्र झाला, एकजीव झाला, सार्वभौम ठरला.' सरदार पटेल हे राष्ट्रीय एकात्मतेचे खरे शिल्पकार होते. त्यांना पोलादी पुरुष म्हणून भारतीय इतिहासात अढळ स्थान प्राप्त झालं आहे. १५ डिसेंबर १९५० रोजी त्यांचा मुंबईत मृत्यू झाला. असे वल्लभभाई-

थोर सेवाभावी। लोकांचा दुःखहर्ता<br>
। होता साह्यकर्ता । संकटात ॥ १<br>
एकनिष्ठ भक्त । होता गांधीजींचा।<br>
मान गुरुजींचा । त्यांना देई ॥२<br>
इंग्रजी सत्तेशी । झुंज घेई सदा ।<br>
दूर करी आपदा । शेतकऱ्यांच्या ॥ ३<br>
समाजशांती । शिस्त-व्यवस्था।<br>
यांचा थोर भोक्ता । खरा नेता ॥४<br>
'सरदार' पदवी । दिली समाजाने ।<br>
प्रशंसा देशाने । केली त्यांची ॥५<br>
बार्डोलीचा वीर । किसानांचा मित्र।<br>
देशाचा सुपुत्र । वल्लभभाई ॥६



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड,
कोल्हापूर-416012
92258 09071

प्रबोधन

# बालदिन नेहरूजयंती विशेष
# विकास घडवा प्रत्येक बाळाचा

'मुलं' हा शब्द उच्चारला की कविमंडळींना 'फुलं' हाच शब्द चटकन आठवतो. या दोन शब्दांत केवळ शब्दसाधर्म्य जे शोधतात, ते रूक्ष कवी असतात. पण जे चैतन्यसाधर्म्य शोधतात ते मात्र मायबापच असतात. खरं तर, मुलं ही शिरीष पुष्पांहून कोमल, जीवनाच्या चैतन्य परिमळाने सुगंधित, निर्झराहून निर्मळ आणि अवखळ; शिवाय जितकी निरागस तितकीच निष्पाप असतात. म्हणून तर जीवनाचे महान उपासक विश्वकवी रवींद्रनाथ टागोर म्हणाले होते, 'जन्माला येणारं प्रत्येक मूल आपणाला हाच संदेश देतं की, मानवजातीविषयी अजूनही ईश्वर निराश झालेला नाही.'

पण विश्वकवी टागोर, महात्मा गांधी किंवा ज्यांनी आपला जन्मदिन बालदिन म्हणून साजरा करावा, असं सांगितलं ते पंडित नेहरू, मुलांचे लाडके साने गुरुजी; तसंच मुलाफुलांचे कवी म्हणून ज्यांना साहित्यसृष्टी ओळखत होती ते रेव्हरंड ना. वा. टिळक, ज्यांच्या नावातच बाल हा शब्द कायमचा जोडला गेला ते 'बालकवी' ठोमरे या सर्वांचं बालकांशी असणारं वर्तन आणि सामान्य माणसांचं असणारं वर्तन यात खूप तफावत असते. थोर पुरुष बालकांकडे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ म्हणून पाहतात. पण सामान्य लोक मुलं म्हणजे दुर्लक्ष करण्याजोगी बाब असंच मानत असतात. आपल्या देशातील फारच थोडे सुजाण पालक वगळले, तर बाकीचे बहुसंख्य पालक मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा, चारित्र्य संवर्धनाचा, निकोप आणि निर्दोष संस्कारवृद्धीच्या दृष्टीने विचारसुद्धा करण्याच्या योग्यतेचे नसतात. त्यांना बालदिन, बालकल्याण, बालसंगोपन, बालबोध, बालविकास, बालहितवर्धन या विषयांत रसही नसतो आणि गतीही नसते. त्यामुळेच बालमजुरीविरोधी विधेयक कागदावर, परिसंवादात, विद्वन्मान्य ग्रंथात, शासन पुरस्कृत चर्चासत्रातच सापडतं. व्यवहारात त्या कायद्याला रद्दीइतकीही किंमत नसल्याची बालमजुरांची दृश्यं खेड्यापासून शहरापर्यंत सर्वत्र दिसतात. भारत येत्या वीस वर्षांत महासत्ता होईल, हे भाकीत वर्तवणाऱ्यांना भारत हा बालमजुरीच्या समस्येने पुढे अनंत काळापर्यंत ग्रासला जाणार आहे, हेही कबूल करावंच लागेल.

भारतात फक्त गरीब मुलंच समस्याग्रस्त आहेत असं नव्हे, तर मध्यमवर्गीय बालकांचंही जीवन जुन्यापुराण्या विचारांनी पछाडलेलंच आहे. गरीब मुलांच्या समस्या पोटाशी निगडित आहेत, तर मध्यमवर्गीय मुलांच्या समस्या संस्कृती नावाच्या भाकड सामाजिक व्यवहाराशी निगडित आहेत. ज्या बालवयात विज्ञाननिष्ठा जोपासली पाहिजे, त्या वयात मुलावर धार्मिक संस्कारांचा दुष्प्रभाव टाकण्याचे आटोकाट प्रयत्न केले जात आहेत. सूर्यनमस्कार घालताना स्नायूंना वळण लावण्याऐवजी सूयार्ची नावं आठवण्याकडे लक्ष लागणं, हे धार्मिक आडवळण नाही का? दीर्घश्वसन करणारा ओं ओं उच्चारून मानसिक आणि शारीरिक क्रियांचा गुंता करून दुविधा में दोऊ गये, माया मिली न राम अशी दुर्दशा भोगतो, हे बरं आहे का? मुलांना अध्यात्माच्या वाटेने नेणं म्हणजे देशाच्या डोक्यात दगड घालणं हे पढतमूर्ख शिक्षक आणि परंपरापीडित पालकांना का कळू नये?

हे कळण्यासाठी आपल्या स्मृती 'बाल दिन' साजरा करून जागवा, म्हणणाऱ्या पंडित नेहरू यांचे साम्यवादी व धर्मनिरपेक्ष विचार जाणून घ्यायला हवेत. त्याशिवाय बालदिनाचं महत्त्व कळणार नाही. कारण-

सधनांची पोरे । होतात सधन<br>
सुखाचे जीवन । त्यांना लाभे ॥१<br>
त्यांची चिंता नको । कराया कुणीही<br>
ज्यांचे बरे नाही। त्यांस पाहा ॥२<br>
दुर्दैवी असती। बाळे गरिबांची<br>
नाही चिंता त्यांची। कोणालाही ॥ ३<br>
गरिबांची मुले। दत्तक घेऊन<br>
करावे कल्याण शासनाने ॥४<br>
व्यसनांपासून । दुगुर्णांपासून<br>
बाळांचे रक्षण । नित्य करा ॥५<br>
विज्ञानाचे प्रेम शिकवा बालकांना<br>
पळवा अज्ञाना। मुळातून ॥६<br>
बालकांची चिंता। नेहरूंनी केली<br>
बालदिना झाली । सुरुवात ॥७<br>
विकास घडवा । प्रत्येक बाळाचा<br>
नेहरूचाचांचा। संदेश हा ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# माढा मतदारसंघातील रस्त्यांचा विकास कागदावरच ॲड. मीनल साठे यांची टीका

**माढा, ( कटूसत्य वृत्त ):-** माढा विधानसभा मतदारसंघात पंढरपूर तालुक्यातील गेल्या पंधरा वर्षांपासून ही ४२ गावे जोडलेली आहेत. या भागातील रस्त्यांचा प्रश्न कायम आहे. यासाठी वेळोवेळी निधी मंजूर केला जातो परंतु रस्त्याचे काम सत्ताधाऱ्यांच्या= नातेवाईक ठेकेदाराला दिले जाते व रस्त्याची परिस्थिती पूर्वीसारखी लगेच झालेली दिसून येते अशी टीका मीनल साठे यांनी केली.



माढा विधानसभा मतदारसंघातील महायुती राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवार ॲड. मीनल साठे यांच्या प्रचारार्थ पंढरपूर तालुक्यातील ४२ गावातील पांढरेवाडी, चिलाईवाडी, आजोती, जाधववाडी येथे जाहीर सभा झाल्या. यावेळी महिला व ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. पांढरेवाडी या ठिकाणी जाहीर सभेत बोलताना मीनल साठे यांनी सांगितले की, प्रियदर्शनी महिला मंडळाच्या माध्यमातून गेल्या दहा वर्षांपासून माढा तालुक्यातील महिलांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण, लघुउद्योग प्रशिक्षण, फूड प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण, बचत गटातील महिलांसाठी विविध व्यवसाय प्रशिक्षण या मंडळाच्या माध्यमातून दिले आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, मार्गदर्शन शिबिर आयोजित केले जाते. भविष्यात या मतदारसंघातील महिलाना, मुलींसाठी सर्वांगीण विकास करण्यासाठी मंडळामार्फत नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जाणार असल्याचे आश्वासन दिले. तसेच महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजना, महिलांना अर्ध्या तिकीट प्रवास तसेच शासनाच्या अनेक योजना विषयी माहिती दिली. मीनल साठे यांचा माढा संपूर्ण मतदारसंघांमध्ये होम टू होम प्रचार प्रभावी होताना दिसत आहे.यावेळी बापूसाहेब फाळके, दगडू पवार, शिवाजी लोहार, रुपाली फाळके, रियाज मुलाणी, विष्णू फाळके, सोनवा आयरे, बापूसाहेब फाळके, जाधववाडी येथे दत्तात्रय शेळके, प्रदीप हजारे, सोमनाथ शेळके, चिलाईवाडी येथे काकासाहेब शेळके, अण्णा शेळके, भारत जमदाडे, प्रदीप सलगर, प्रल्हाद गायकवाड, अजोती येथे राजू आरकीले, सुभाष साळुंखे, प्रशांत गुटाळ आदी उपस्थित होते.

# स्वीपच्या माध्यामातून १७ नोव्हेंबरला आयोजित ड्वोटाथॉनछ मध्ये नाशिककरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम

**नाशिकः** महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 मध्ये नागरिकांनी जास्तीत जास्तीत संख्येने मतदान करावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद नाशिक व नाशिक महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार 17 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी 7 वाजता 'वोटोथॉन' चे आयोजन केले आहे. या 'वोटोथॉन' मध्ये नाशिककरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. तसेच 20 नोव्हेंबर 2024 रोजी प्रत्येक नागरिकांनी आवर्जून मतदान करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात आज सायंकाळी आयोजित पत्रकार परिषदेत विभागीय आयुक्त डॉ.गेडाम बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपच्या नोडल अधिकारी आशिमा मित्तल, नाशिक महानगरपालिकेचे उपायुक्त (प्रशासन) लक्ष्मीकांत साताळकर, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा फडोळ, तहसीलदार मंजुषा घाटगे, अमोल निकम यांच्यासह अधिकारी व पत्रकार उपस्थित होते. 'स्वीप'च्या माध्यमातून जिल्हा प्रशासनाकडून मतदार जनजागृती करण्यात येत आहे. जिल्हावासियांनी 20 नोव्हेंबर रोजी घराच्या बाहेर पडून मोठ्या संख्येने मतदान प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवावा. मतदान झाल्यावर सेल्फी काढून सोशल मीडियाच्या माध्यमातून इतरांनाही प्रोत्साहित करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी केले.

# विकासकामांमुळे जनता अपप्रचाराला बळी पडणार नाही

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** वैरागमध्ये दुय्यम निबंध कार्यालय आहे. अनगरच्या दुय्यम निबंधक कार्यालय प्रसंगी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांशी असणाऱ्या स्नेहसंबंधामुळे अनगरला अप्पर कार्यालय मंजूर झाले आहे. ते कार्यालय जनसामान्यांच्या हितासाठीच आहे. त्या परिसरातील कोणाचीही याबाबत तक्रार नाही. केवळ विरोधक अप्प्रचार करत आहे. मात्र,आ.यशवंत माने यांनी मागील पाच वर्षांत केलेल्या विकासकामांचा डोंगर पाहता जनता अप्प्रचाराला बळी पडणार नाही, असा विश्वास माजी आमदार राजन पाटील यांनी व्यक्त केला.मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे अजित पवार गट महायुतीचे अधिकृत उमेदवार आ.यशवंत माने यांच्या प्रचारार्थ एकुरके, भोयरे व मलिकपेठ,घाटणे, आढेगाव सौंदणे, तांबोळे व पोखरापूर गावांना भेटी दिल्या. यावेळी पोखरापूर येथील सभेत ते बोलत होते.राजन पाटील पुढे म्हणाले, आष्टी उपसा सिंचन योजनेतून पोखरापूर तलावात पाणी सोडण्याच प्रश्न आता मार्गी लागला आहे. येणाऱ्या काळामध्ये देखील उर्वरित प्रश्न मार्गी लागतील.यावेळी उमेदवार यशवंत माने म्हणाले, तुम्ही भूमिपुत्राला उमेदवारी देऊ म्हणाले होते. भूमिपुत्राची शिफारस पैसे नाहीत म्हणून केले नाही का, म्हणून तुम्ही लक्ष्मीपुत्र आणला आहे का. त्यामुळे तुम्हाला नागनाथ महाराज माफ करणार नाहीत. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्षप्रकाश चवरे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख दादाराव पवार, भाजपाचे जेष्ठ नेते संजीव खिलारे, बाळासाहेब भोसले, संतोष जाधव, सिंधुताई वाघमारे,सुरेखा बाबर, चंद्रहार चव्हाण, बाळासाहेब पाटील, नानासाहेब डोंगरे, रमेश डोंगरे,प्रविण डोंगरे, विठ्ठल डोंगरे, विकास डोंगरे, भारत सुतकर, विकास कोकाटे,सचिन भानवसे, शिवाजी सोनवणे,माऊली चव्हाण, शिवाजी चव्हाण.विजय कोकाटे, संभाजी कोकाटे, पोपट हांडे आदी महायुतीचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.



## वात्रटिका

### कळेल..वाट बघा

उतावीळ झाले नेते<br>
अंदाज बांधू लागले...<br>
कुणाला किती जागा<br>
हे ठामपणे सांगू लागले..<br>
मत देणारा मतदार<br>
जणू यांनी गृहित धरला...<br>
जादू घडेल बटनातून, आणि<br>
मगच कळेल कोण तरला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार सोमनाथ वैद्य यांनी प्रचारात घेतली आघाडी



**सोलापूर(कटूसत्यवृत्त):-** दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार सोमनाथ वैद्य यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. प्रचारादरम्यान शहरी तसेच ग्रामीण भागातील म तदारांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. सर्वसामान्य जनतेशी नाळ जुळवणारा नेता म्हणून वैद्य यांची ओळख निर्माण होत आहे. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात सोमनाथ वैद्य हे अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात आहेत. आतापर्यंत त्यांनी मतदारसंघातील ग्रामीण भाग दक्षिण सोलापूर विधानसभा पिंजून काढला आहे. निवडणुका मतदारसंघातील शहरी भागात विविध कार्यक्रमानिमित्त हजेरी लावली यामुळे त्यांचा शहरी भागातील मतदारांचा ही परिचय झालेला आहे. त्यांच्या कामातून त्यांनी त्यांची प्रतिमा निर्माण केली असल्यानेच मतदारांचा त्यांच्याकडे ओढा वाढताना दिसत आहे. रविवार १० रोजी वैद्य यांनी सलगरवस्ती, पारधी वस्तीसह परिसरात पदयात्रा काढली. या पदयात्रेत त्यांना मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. या पदयात्रेमध्ये अर्जुन जाधव, लक्ष्मी जाधव, सचिन गायकवाड, मारुती गडाख, मच्छिंद्र क्षीरसागर, राजश्री कांबळे, दत्ता पवार, सदा नाईकवाडी, अशोक म सरे, सागर आपटे, संजय नकाते आदी सहभागी झाले होते.. जनतेने मला निवडून दिल्यास जनतेचा आमदार म्हणून मी काम करेन असे आश्वासन वैद्य यांनी यावेळी मतदारांना दिले. गेल्या दोन महिन्यापासून या म तदारसंघातील मतदारांच्या मी संपर्कात असल्याने विरोधकांची पायाखालची वाळू सरकली असल्याचे वैद्य म्हणाले.

विद्यमान आमदारांनी अनेक आश्वासने दिली. परंतु त्याची पूर्तता करण्यात ही कमी पडले. जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यानेच जनता यावेळी त्यांच्या भूलथापांना बळी पडणार नाही, असा विश्वास वैद्य यांनी यावेळी व्यक्त केला. दरम्यान मंत्रालयात असलेला माझा संपर्क हा जनतेच्या कामासाठी उपयोगी पडणार आहे. त्याचमाध्यमातून मी जनतेचे प्रश्न मार्गी लावणार असून दक्षिण विधानसभा मतदारसंघ सुजलाम सुफलाम करण्याकडे माझा कल असणार असल्याचे वैदे यांनी सांगितले. दक्षिण सोलापूरच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या योजना आणून त्या माध्यमातून येथील जनतेचा विकास साधणार आहे. शेती बरोबरच औद्योगिक विकासालाही चालना देण्याचा प्रयत्न करणार आहे. यामुळे तरुणांच्या हाताला रोजगार मिळेल व इतर जिल्ह्यात जाणारा तरुणांचा लोंढा थांबेल असे वैद्य यांनी यावेळी स्पष्ट केले.

# संविधान आणि लोकशाहीचे संरक्षण करणे ही आपली प्रत्येकाची जबबदारी - योगेंद्र यादव



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना जे देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात नव्हते, ज्यांना या देशाचे संविधान मान्य नव्हते तेच सत्तेत आहेत.त्यामुळेच

संविधानिक मूल्ये सध्याच्या राजवटीत पायदळी तुडवली जाण्याचा अनुभव आपण वारंवार घेत आहोत.लोकशाहीचा गळा घोटला जात आहे.हे थांबवायचं असेल तर लोकशाहीच्या उत्सवात प्रत्येकाने देशविघातक शक्तीला मतदानातून रोखलं पाहिजे देश आणि संविधानाचे रक्षण करणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे असे विचार

भारत जोडो अभियानचे संयोजक योगेंद्रजी यादव यांनी मोहोळ येथे व्यक्त करून करून संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते.

शनिवारी ९ नोव्हेंबर २०२४ रोजी सायं ४ वाजता लोकसेवा कॉन्फरन्स हॉल,कुरुल रोड मोहोळ या

ठिकाणी भारत जोडो अभियानचे संयोजक मा. योगेंद्रजी यादव यांच्यासह प्रमुख वक्ते उल्का महाजन ,संजय मंगो ,डॉ.सुनिलम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड.गोविंद पाटील होते.

यावेळी वरील वक्त्यांनी बोलताना सांगितले की , 'लोकशाही यंत्रणांचे खच्चीकरण सुरू आहे. देशातील अल्पसंख्याक, आदिवासी, दलित व महिलां वरील अत्याचार मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत.एका बाजूला बहुजन समाजाच्या शिक्षणाच्या वाटा बंद करत,लोकशाही व्यवस्थाच संपवण्याचा डाव सातत्याने सुरू आहे.देशातील बेरोजगारी व विषमता शिगेला पोहोचली आहे.शिव-फुले-शाहू आंबेडकर-सावित्रीबाई आणि अहिल्यामाई-फातिमा यांचे सामाजिक न्याय, समानता आणि बंधुताचे विचार नष्ट करून संविधानाने दिलेले अधिकार छुप्या पद्धतीने नाकारण्याचा प्रयत्न केला जात आहे.अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाकारले जात आहे. अनेक सामाजिक विचारवंत, साहित्यिक,कलाकार, प्रामाणिक अधिकारी दडपणाखाली असल्याचे पाहवयास मिळत आहे.गेल्या काही वर्षात सर्व स्तरावर देशाची पीछेहाट सुरु आहे.महाराष्ट्राचीही यापेक्षा वेगळी परस्थिती नाही.महाराष्ट्राला आजपर्यंत राजकीय आणि सामाजिक सभ्यतेची संस्कृती लाभली आहे.मात्र राजकारणातील नैतिकता आणि विचारधारा धाब्यावर बसवून गेल्या काही वर्षांत शासन, सरकारी यंत्रणा याचा गैरवापर केला जात आहे. सत्तेचा गैरवापर करून महाराष्ट्रा च्या आजवरच्या ५०-६० वर्षांच्या सामाजिक

आणि सांस्कृतिक वाटचालीला गालबोट लावले जात आहे.जात-पात आणि धर्माच्या नावावर समाजातील सलोखा बिघडवून सत्ता कायम ठेवण्यासाठी अवैध आणि संविधानिक चौकटीत न बसणारी कृत्ये वारंवार केली जात आहेत.यात कुठेही महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासाचा विचार आणि धोरण दिसत नाही. तात्पुरत्या घोषणा आणि लोभ दाखवून विकासाला खीळ घालण्याचा प्रयत्न केला जात आहे. आणि हे असेच सुरु राहिले तर याचा महाराष्ट्राच्या विकासाव र दूरगामी परिणाम होणार असून ते परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागतील.या परिस्थितीचा गांभी यार्ने विचार करण्याची वेळ आली आहे.प्रत्येक नागरिकासाठी न्याय,स्वातंत्र्य,समता,आणि बंधुत्वाचे घटनात्मक वचन सुरक्षित राखण्यासाठी आणि पुरोगामी महाराष्ट्राची एकता आणि सामाजिक सलोखा बिघडवू पाहणाऱ्या मनुवादी आणि विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या शक्तींना रोखण्यासाठी समाजातील सर्व घटकातील परिवर्तनशील विचाराच्या व्यक्ती, संघटना यांनी

एकत्रित येऊन पुढाकार घेतला पाहिजे असे सांगितले .

यावेळी आकाश फाटे ,मनोज मोरे, धर्मराज चवरे,शशिकांत ठोकळे ,पांडुरंग सुरवसे,राजेंद्र फडतरे, सिताराम केवळे ,मनोहर गोडसे,प्रशांत माने, चंद्रकांत फाटे ,विनय पाटील ,रमेश बारसकर ,शंकर ढगे,श्री जगताप ,बाळासाहेब जाधव ,बंटी आवारे ,नागनाथ मुळे ,अनिल कोरे, रजनीश कसबे, संजय भोसले , मोहन कादे , दिपक पारडे ,सुरेश साठे ,रमेश साठे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक विनोद कांबळे यांनी ,सुत्रसंचालन शिलवंत क्षीरसागर यांनी , तर आभार बिरमल खांडेकर यांनी मानले.

# ठाकरेंची तपासणी, ही तर भाजपची हुकूमशाही!

## रोहन सुरवसे पाटील यांची टीका; विरोधकांची झोप उडाल्याने सुडाचे राजकरण



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** "राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वणी (नाशिक) येथे बॅग तपासण्याचा प्रकार संतापजनक आहे. मुख्यमंत्री राहिलेल्या व्यक्तीची अशाप्रकारे तपासणी करणे ही सत्ताधारी भाजपाची हुकूमशाही वागणूक आहे. ठाकरे यांच्या झंझावाती प्रचाराने विरोधकांची झोप उडाली आहे," अशी टीका महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी केली.

रोहन सुरवसे पाटील म्हणाले, "राज्यात विधानसभेच्या निवडणुकीचे वारे वाहत आहेत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यभरात प्रचारसभांचा धडाका लावला आहे. त्यामुळे विरोधकांची झोप उडाली असून, सूडभावनेने राजकारण सत्ताधारी करीत आहेत. नाशिकच्या वणीमध्ये काल ठाकरे यांची सभा होती. सभेसाठी ठाकरे हेलिकॉप्टरने गेले होते. हेलिपॅडवर उतरताच ठाकरे यांची बॅग निवडणूक अधिकाऱ्यांनी तपासल्याचे समोर आले आहे. दस्तुरखुद्द उद्धव ठाकरे यांनी याचा व्हिडीओ शूट करत जनतसमोर सत्ताधाऱ्यांचा पदार्फाश केला आहे."

उद्धव ठाकरे यांची बॅग तपासणे योग्य होते का? आजपर्यंत कुठल्या मंत्र्याच्या हेलीपॅडवर बॅगा तपासल्या आहेत का? राज्यात महायुतीची सत्ता असल्याने राज्यात असे प्रकार घडताहेत का? असे प्रश्न रोहन सुरवसे पाटील यांनी उपस्थित केले. उद्धवसाहेबांच्या सामानाची तपासणी केली, तशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यासह इतर मंत्र्यांची तपासणी होईल का? असा प्रश्न माज्यासारख्या सामान्य नागरिकाला पडला आहे, असेही सुरवसे पाटील म्हणाले.

रोहन सुरवसे पाटील पुढे बोलताना म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानात सगळ्यांना समान न्याय आहे. मात्र, यंत्रणांना हाताशी धरुन लोकशाहीला पायदळी तुडवून हुकुमत गाजवण्याचे आणि संविधानाचा सातत्याने अवमान करण्याचे काम सत्ताधारी करत आहेत. मात्र, या सगळ्यावर मात करून महाविकास आघाडी या विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळवेल, असा विश्वास वाटतो.

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**यात्रा**
उज्जैन, सिहोर, प्रदीप महाराज सह शेगाव, ५ ज्योतिर्लिंग, १८ सप्टेंबर अष्टविनायक, भीमाशंकर, जेजुरी १९ सप्टेंबर, श्रीशैल्य, तिरुपती, रामेश्वर, कन्याकुमारी १० नोव्हेंबर, काशी, अयोध्या २७ नोव्हेंबर
**मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स**
**९४२२४६०३१९**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क:**
9881361260

**पाहिजेत**
**फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी हुशार कामगार पाहिजे.**
**संपर्क:**
**गणेश स्टील फॅब्रिकेशन**
**९९२२५२५२३७**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.







# माढा तालुक्याच्या अस्मितेसाठी आमदार बबनदादा व मी एकत्र आलोय - प्रा.शिवाजीराव सावंत

## अपक्ष उमेदवार रणजीत शिंदे यांच्या प्रचारार्थ मानेगाव व उंदरगाव येथे सभा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** या विधानसभा निवडणुकीत आमदार शिंदे गट व सावंत गट एकत्र येणे विरोधकांना रुचले नाही.आम्ही दोन्ही गट एकत्र आल्याने रणजीत शिंदेच आमदार होणार हे नक्की झाले आहे त्यामुळे आता दुसऱ्या कोणाचीही डाळ शिजणार नाही. विरोधी उमेदवाराच्या खांद्यावर बसून बाहेरच्या तालुक्यातील शक्ती माढा तालुक्यात येऊ पाहतेय.हे बाहेरच्या आक्रमण व तालुक्याच्या अस्मितेसाठी आम्ही दोन्ही गट विचारपूर्वक एकत्र आलो आहोत. मी आ.बबनदादा एकमेकांच्या विरोधात लढलो हे जरी खरे असले तरी जेंव्हा-जेंव्हा बाहेरच्या तालुक्यातील राजकीय आक्रमण येईल तेंव्हा-तेंव्हा ते रोखण्यासाठी आम्ही निर्णय घेतले आहेत. माढा तालुक्याच्या विकासाचे निर्णय जर अकलूजमधून होणार असतील तर ते आम्ही कदापि सहन करणार नाही. विरोधकांना पुन्हा निवडणूक लढविण्याची तलफ झाली नाही पाहिजे अशा विक्रमी मतांनी अपक्ष उमेदवार रणजीत बबनराव शिंदे यांना मतदान करण्याचे आवाहन शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत यांनी केले आहे.

ते मानेगाव व उंदरगाव ता.माढा येथे विधानसभा निवडणुकीचे अपक्ष उमेदवार रणजीत शिंदे यांच्या प्रचारार्थ विराट सभेत मंगळवारी 12 नोव्हेंबर रोजी बोलत होते.

यावेळी समाजकल्याणचे माजी सभापती शिवाजी कांबळे म्हणाले की,नुसते डिजिटल बोर्ड लावून आमदार होता येत नसते. आमदार होण्यासाठी शेतकरी, सर्वसामान्य जनता व गोरगरिबांची कामे करावी लागतात हे कदाचित विरोधी उमेदवारला माहीत नसल्याचा टोला त्यांनी लगावला.आमदार शिंदे यांच्यामुळे माढा तालुक्यात तीन ठिकाणी एमआयडीसी व पाच साखर कारखाने सुरू झाले आहेत.हे राज्यातील एकमेव उदाहरण आहे.जे स्वतःला राज्याचे नेते व माढा तालुक्यात अतिक्रमण करु इच्छित आहेत त्यांच्या माळशिरस तालुक्यात एकही एमआयडीसी नाही.त्यांच्या साखर कारखान्याने सातत्याने गोरगरीब शेतकऱ्यांची लूट केली आहे. त्यांनी कधीच विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याएवढा दर दिला नाही ही वस्तुस्थिती आहे. वाळू उपसा करणाऱ्यांच्या हाती मतदारसंघ न देता विकासकामांचा डोंगर उभा करणाऱ्या आ.बबनराव शिंदे यांच्या रणजीत शिंदे या कर्तबगार मुलाला विधानसभेत पाठविण्याचे आवाहन त्यांनी केले.



"तर मी राजकारणातून संन्यास घेईन" - आ.बबनराव शिंदे - विरोधकांकडे विकासकामाचा कसलाही अजेंडा नसल्यामुळे ते नुसता खोटा प्रचार व थापा मारून जनतेची दिशाभूल करत आहेत.पंढरपूरचा विठ्ठल सहकारी साखर कारखाना बंद करण्यासाठी जिल्हात जर माझ्या उपस्थितीत साखर कारखानदारांची मिटिंग झाली असे विरोधी उमेदवार अपप्रचार करीत आहेत.जर अशी मिटिंग झाल्याचे त्यांनी पुराव्यासह सिद्ध केले तर मी राजकारणातून संन्यास घेतो असे सभेत त्यांनी खुले आव्हान दिले.शासनाची तत्वतः अंतिम मंजुरी मिळालेल्या खैराव-मानेगाव उपसासिंचन योजनेची टेंडर प्रक्रिया सुरू होणार आहे.प्रा.शिवाजीराव सावंत गट, प्रहार शेतकरी संघटना,रयत क्रांती संघटना, शिवाजी कांबळे यांनी रणजीत शिंदे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे त्यामुळे विजयासाठी कोणत्याही ज्योतिषाकडे जाण्याची गरज नाही.23 नोव्हेंबर रोजी गुलाल आपणच उधळणार आहोत.रणजीत शिंदे यांचे सफरचंद हे चिन्ह घरोघरी जाऊन प्रत्येक मतदारांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी केले.

या दोन्ही ठिकाणच्या सभेत कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुहास पाटील, माढेश्वरी बँकेचे व्हा.चेअरमन अशोक लुणावत, दूध संघाचे संचालक शंभूराजे मोरे, माजी सभापती शिवाजी कांबळे, विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे संचालक अमोल चव्हाण, निलकंठ पाटील, संदीप पाटील, सुभाष नागटिळक, उल्हास राऊत, हनुमंत चौधरी, रयत क्रांतीचे प्रा. सुहास पाटील, शिवसेनेचे मुन्ना साठे, हनुमंत पाडूळे, गणेश काशीद, बाबा चव्हाण, अशोक चव्हाण, विद्या पाटील, लक्ष्मण देशमुख, पंडित पाटील, विलास कदम, औदुंबर देशमुख, बाबा शेळके, अमर बडेकर, हरीश कारंडे, तानाजी देशमुख, महेश पाटील, बिरूदेव शेळके, शरद नागटिळक, आप्पाराव वाघमोडे, अरविंद नाईकवाडे, पंढरपूरचे मारुती जाधव, सरपंच तानाजी लांडगे, अशोक शिंदे, रमेश भोईटे, राजेंद्र खोत, संतोष लोंढे, बाळू इंगळे, बाबा पारडे, शिवाजी बारबोले, कुमार शिंदे, भगवान लटके, मार्तंड जगताप, रमाकांत कुलकर्णी, ज्ञानेश्वर पाटील, रोहिदास कापसे, रवींद्र चव्हाण, राजाभाऊ भोगे, सूरज पाटील, वैजिनाथ व्हळगळ,नवनाथ तांबिले, सुधीर मस्के, विश्वनाथ पारडे, सिद्धेश्वर राऊत, शिवाजी भोगे, माणकोजी भुसारे, मदन आलदर, निलेश भोसले, महेश चव्हाण, बालाजी नाईकवाडे, चंद्रकांत व्हनमाने, भारत भांगे, आण्णा मस्के, भारत लटके, राजाभाऊ पाटील, विनायक चौगुले,यासीन शेख, इंद्रनील क्षीरसागर, धनाजी सुतार,पिंटू नागटिळक, बाबा वाघमोडे यांच्यासह गावोगावचे आजी-माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन, व्हा.चेअरमन व संचालक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, साखर कारखाने, जिल्हा दूध संघ, माढेश्वरी अर्बन व जिल्हा मध्यवर्ती बँक,मार्केट कमिटी, खरेदी विक्री संघाचे आजी-माजी संचालक यांच्यासह शेतकरी, ग्रामस्थ, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत द्यावी- स.कामगार आयुक्त सु.म.गायकवाड


**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हयातील विधानसभा मतदार संघ क्षेत्रात मतदानाचा हक्क बजावण्यासाठी योग्य संधी प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने या क्षेत्रात असलेल्या मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दि 24 ऑक्टोबर 2024 रोजी च्या परीपत्रकानुसार मतदानाच्या दिवशी सुट्टी अथवा दोन तासाची सवलत हि उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने दुकाने इत्यादीना लागु राहील.

सोलापूर विधानसभा सार्वत्रीक निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर सोलापूर जिल्हयातील खाजगी कंपन्या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे नाटय गृहे व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इत्यादींना सुचना देण्यात येत आहे कि, दि.20 नोव्हेंबर 2024 रोजी मतदानाच्या दिवशी कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सार्वजनिक सुट्टी देण्यात यावी.

जर अपवादात्मक परिस्थितीत उत्पादन प्रक्रीयेतील कारखाना सुरु ठेवून मतदानासाठी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देण्याबाबत मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असून त्यांच्या परवानगीनेच दोन तासांची सवलत देता येईल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबधित अस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

या कार्यालयामध्ये 'दक्षता-कक्ष' स्थापन करण्यात आला असून कामगारांच्या मतदाना विषयक काही तक्रारी असल्यास कार्यालयाच्या 0217-2728401 या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन सहायक कामगार आयुक्त तथा नोडल अधिकारी लेबर वॉटर्स सोलापूर यांनी केले आहे.


## कटूसत्य शब्दकोडे क्र. १०७



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

**शब्दकोडे क्र. १०६ चे उत्तर**



# आगामी पाच वर्षांत अक्कलकोटचा कायापालट करू : कल्याणशेट्टी




**अक्कलकोट( कटूसत्य वृत्त ):-** तालुक्याचा एक मॉडेल म्हणून विकास होण्यासाठी सर्व कामे मंजूर झाली आहेत. आता या कामांना चालना देण्यासाठी आणि विकासाचे चक्र पुढे सुरू ठेवण्यासाठी महायुतीशिवाय पर्याय नाही. त्यामुळे तालुक्यातील जनतेने भूलथापांना बळी न पडता भाजपच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रचारार्थ वागदरी येथे आयोजित सभेत ते बोलत होते. कल्याणशेट्टी म्हणाले, वागदरी भाग नेहमीच भाजपच्या पाठीशी राहिला आहे. यावेळीसुध्दा तो राहील याबद्दल मला विश्वास आहे. या भागातील विकासाचा अनुशेष आपण भरून काढू.

माजी जि. प. सदस्य आनंद तानवडे म्हणाले, कुठल्याही अफवा अथवा भूलथापांना बळी न पडता एकदिलाने सर्वांनी भाजपला निवडून आणावे. गेल्या पाच वर्षांत कल्याणशेट्टी यांनी तालुक्याचा चौफेर विकास केला आहे. अप्पू बिराजदार म्हणाले, राज्यात पुन्हा एकदा भाजप महायुतीचे सरकार आणण्यासाठी कमळ या चिन्हासमोरील बटण दाबून भाजप महायुतीला प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी संजय देशमुख, दिलीप सिध्दे, अविनाश मडिखांबे, शिवराज स्वामी, मल्लिनाथ स्वामी, महेश हिंडोळे, राजेंद्र बंदीछोडे, शरणप्पा मंगाणे, धोंडप्पा यमाजी, सागर कल्याणशेट्टी, अमोल हिप्परगी आदी उपस्थित होते.

# स्वत:चे दु:ख बाजूला ठेवून लोकसेवा करणाऱ्यास संधी द्याः पाटील



**अक्कलकोट ( कटूसत्य वृत्त ):-** धर्मपत्नी व पित्याचे छत्र हरपल्याचे दुःख बाजूला सारून सर्वसामान्यांच्या कायार्साठी सदैव झटणारे अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार सिध्दाराम म्हेत्रे यांना विजयी करून विधानसभेत पाठवा, असे आवाहन आळंदचे आमदार बी. आर. पाटील यांनी केले.

चपळगाव येथे महाविकास आघाडीचे उमेदवार सिध्दाराम म्हेत्रे यांच्या प्रचारार्थ आयोजित कॉर्नर सभेत ते बोलत होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य पांडुरंग चव्हाण होते.

पाटील म्हणाले, अक्कलकोट तालुक्याचा विकास सिध्दाराम म्हेत्रे यांच्या दूरदृष्टीमुळे झाला आहे. म्हेत्रे यांनी केलेली कामे आजही दर्जेदार आहेत. त्याचा उपयोग लोकांना होत आहे. यावेळी राज्यात महाविकास आघाडीला चांगले वातावरण आहे. सिध्दाराम म्हेत्रे हे अक्कलकोट तालुक्याचे नेतृत्व करतील आणि विजयी होऊन ते मंत्री होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बसवराज बाणेगाव, सिध्दाराम भंडारकवठे यांनीही म्हेत्रे यांच्या कायार्बाबत उपस्थितांना माहिती देत त्यांना निवडून आणण्याचे आवाहन केले. या सभेला सिध्दार्थ गायकवाड, विश्वनाथ भरमशेट्टी, सुनील बिराजदार, सिध्दाराम भंडारकवठे, बसवराज बाणेगाव, अबुजर पटेल, शाकीर पटेल, मज्जू चौधरी, मल्लिनाथ माळगे यांच्यासह महाविकास आघाडी व काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोमनाथ वैद्य हेच दक्षिणचा विकास करू शकतील



**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** सोलापूर दक्षिणचे अपक्ष उमेदवार ॲड. सोमनाथ वैद्य यांना आता आ.विनय कोरे यांच्या जनसुराज्य पार्टी यांनी सहकार्य करण्याचे ठरवले आहे.सोमनाथ वैद्य हेच दक्षिणचा विकास करू शकतील, असा पार्टीर्चा विश्वास आहे, त्यामुळे सहकार्य करत असल्याचे सांगण्यात आले. याबाबतचे पत्र त्यांनी वैद्य यांना दिले आहे.याप्रसंगी स्थानिक पक्षसंपर्क प्रमुख रवींद्र कोरे, श्रीशैल कलशेट्टी, ॲड. अनिल जाधव, शंभूराजे वानकर, सोमनाथ बिराजदार, राजू अंजनगावकर, नासिर चाचा, गणेश भोसले, प्रमोद कलशेट्टी, अनिल साखरे,स्वप्नील मंडलिक आदी उपस्थित होते.

# पंढरपूर मध्ये महाविकास आघाडीकडून अजून एक धक्का



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर-मंगळवेढा या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व काँग्रेस यांच्यामध्ये जोरदार रस्सीखेच होताना दिसून येत आहे यामध्येच काल राष्ट्रवादी चे डॉ अमोल कोल्हे यांनी पंढरपूर येथे उमेदवार अनिल सावंत यांच्या निवासस्थानी एक पत्रकार परिषद घेऊन सविस्तर माहिती देऊन सर्व गोष्टींचा खुलासा केला. आपला विरोधक फक्त आणि फक्त भाजप पक्ष आहे आणि विद्यमान आमदार आहेत. तर आज अनिल सावंत यांनी पंढरपूर मधील गावांचा झंझावाती दौरा सुरु केला त्यातच लक्ष्मी टाकळी येथे अनेक नेत्यांनी आपल्या भाषणात गतवेळी दोन वर्ष दोन्ही मतदारसंघांमध्ये पंढरपूर असेल मंगळवेढा असेल या मतदारसंघांमध्ये गाव बैठक घेऊन प्रचार केला आणि निवडणुकी पुरती आश्वासने दिल्याने त्यांच्यावरती विश्वास ठेवून त्यांना मतदान केले अशा भावना व्यक्त केल्या .पण त्यांनी काय केले ? असा सवाल हि मतदारांना संबोधित करताना नेत्यांनी केला आधीच्या नेत्यांनी सगळ्यांचा विश्वास तोडला असे नमूद केले , विद्यमान आमदारांना की ज्या माणसांच्या,मतदारांच्या पाठीमागे लागून आपण खुर्चीवर बसला त्याच माणसांना आपण वऱ्यावरती सोडले ही परिस्थिती जर त्यांच्या जवळच्या व्यक्तींची असेल तर आपल्या सामान्य जनतेचा आणि कार्यकर्त्यांचे काय होणार या भागामध्ये विकास करत असताना एवढ्या कोटीचा निधी आणला तेवढ्या एवढ्या कोटीचा विकास निधी आणला अशा व वलग्ना करणारे विद्यमान आमदार खरंच या भागात विकास झाला का..? जेवढा निधी आणला त्याच पद्धतीचा विकास झालाय का नाही हे माज्यापेक्षा आपल्या लोकांना अधिक तरुण पिढीला तुमच्यासारख्या समोर बसलेल्या मातांना भगिनींना चांगलं माहिती असल्याचे प्रतिपादन उमेदवार अनिल सावंत यांनी केले.

आज लक्ष्मी टाकळी येथे परमेश्वर लक्ष्मण देठे, माजी संचालक विठ्ठल सहकारी साखर कारखाना. मा.संचालक पंढरपूर मार्केट कमिटी. महादेव मारुती देठे माझी संचालक सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना. मच्छिंद्र अर्जुन देठे प्रगतशील बागायतदार. रघुनाथ विठ्ठल देठे. हनुमंत शिवाजी देठे. मारुती सुखदेव रवळू. नाथा रमेश देठे. राजेंद्र रंगनाथ बागडे. बजरंग महादेव देठे. धर्मा गोवर्धन लवंड. विशाल बंडू देठे अधिक कार्यकर्त्यांनी अनिल दादा सावंत साहेब गटात जाहीर प्रवेश केला.

यावेळी लक्ष्मी टाकळी गावातील तसेच महाविकास आघाडीतील पदाधिकारी कार्यकर्ते तसेच गावातील ग्रामस्थ महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तोफिक पैलवान म्हणजे दुसरे न्यायाधीश वकील बांधवांनी दिला तौफिक शेख यांना पाठिंबा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** २४९ सोलापूर शहर मध्य विधानसभेचे अपक्ष उमेदवार तोफिक शेख यांची चर्चा शहर मध्ये जोरदार रंगत आहे तौफिक शेख यांची शहर मध्य मध्ये सभा मीटिंग कॉर्न सभा गुप्त बैठका यांसह आदींची यंत्रणा राबवत असून आज अपक्ष उमेदवार तोफिक शेख यांना सोलापूर शहर परिसरातील वकील मंडळींनी जाहीर असे पाठिंबा दर्शवले दरम्यान यावेळी शेख यांना पुष्पहार अर्पण करत धर्मांत व जातीवादी पक्षाला थारा न देता तोफिक शेख सारख्या सच्चा माणसाच्या पाठीमागे आपण सर्वजण उभे राहू इतकेच नव्हे तर तोफिक शेख म्हणजे दुसरे न्यायाधीश असे वकील मंडळी बोलताना म्हणाले यावेळी ॲड. असीम बांगि यांच्या कार्यालयासमोर सत्कार व पाठिंबा देण्यात आले सदर कार्यक्रमास ॲड. सुरेश बापू गायकवाड, (माजी अध्यक्ष बार असोसिएशन, सोलापूर) ॲड. असीम बांगी, (माजी उपाध्यक्ष बार असोसिएशन, सोलापूर)
ॲड. करण भोसले, (माजी सचिव बार असोसिएशन, सोलापूर)
ॲड. खतीब वकील ज्येष्ठ वकील, ॲड. MA इनामदार ज्येष्ठ वकील, ॲड. बडेखान सर ,ज्येष्ठ वकील ॲड. रईसा मदनी ज्येष्ठ वकील, ॲड. जाहिद दर्जी, ॲड. अब्दुल शेख , ॲड. परवेझ मुलाणी ॲड. धनंजय येमुल, ॲड. फिरोज शेख, ॲड. इक्बाल शेख, ॲड. ऋषिकेश मट्रे , ॲड. आसिफ पटेल
ॲड. वसीम डोंगरी, ॲड. आकाश माने, ॲड. अब्दुल्ला खतीब, ॲड. सैफ शेख, ॲड. इरांना बिराजदार, ॲड. दनिया शेख , ॲड. जुवेरिया शेख,ॲड. महेक शेख,ॲड. फरझाना शेख ,ॲड. राठोड,ॲड. अझहर मुजावर, ॲड. नौशाद पटेल, ॲड. सागर आनंद, ॲड. . नूर मुतवॉली, ॲड. नबी जमखंडी, ॲड. वसिम शेख यांसह आदींची उपस्थिती होती.

# एमआयएमची शहर मध्य विधानसभा संघात जबरदस्त कॉर्नर बैठक

## सर्व समाजातील मतदारांचा प्रतिसाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अक्टक्ट सोलापूर शहर मध्यचे उमेदवार फारूक शाब्दी यांनी भारत नगर, बेगम पेठ, पाच्छा पेठ येथे जबरदस्त कॉर्नर बैठक घेतली.कॉर्नर बैठकित भारत नगर, बेगम पेठ, पाच्छा पेठ येथील मुस्लिम, दलित, मोची, पद्मशाली,असे सर्व समाजातील मतदार सहभागी झाले होते. भारत नगर येथील बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला फारुख शाब्दी यांनी पुष्पहार अर्पण केला. कॉर्नर बैठकीत फारुख शाब्दी यांनी महत्वपूर्ण घोषणा केल्या. मी माज्या माता भगिनींसाठी चार वेगवेगळ्या योजना आणणार आहे. सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील एमआयएमचे उमेदवार फारूक शाब्दी यांनी भारत नगर, बेगम पेठ, पाच्छा पेठ मधील सर्व मतदारांना विश्वासपूर्ण आश्वासन दिले. आमदार झाल्यावर भारत नगर, बेगम पेठ, पाच्छा पेठ भागातील सर्वांगीण विकास करणार अशी ग्वाही दिली. या बैठकीत अक्टक्ट चे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २५१ सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघात वंचित चे संतोष सेवू पवार यांचाच बोलबाला



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** २५१ सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघातून वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार संतोष सेवू पवार यांना शहरी आणि ग्रामीण भागात वाढता पाठिंबा मिळत आहे. संतोष पवार हे सर्व समाजाला सोबत घेऊन जाणारे एक युवा नेतृत्व असून, मतदारसंघात त्यांची प्रचारात आघाडी घेतली आहे.

यावेळी चौरंगी लढत पाहायला मिळणार आहे, ज्यात अपक्ष धर्मराज काडादी, शिवसेना (उबाठा) चे अमर पाटील, भाजपचे सुभाष देशमुख आणि वंचित बहुजन आघाडीचे संतोष पवार यांच्यात तीव्र स्पर्धा आहे. विशेषतः ग्रामीण भागात संतोष पवार यांचे गेली २/३ वषार्तील सक्रिय कार्य पाहता त्यांना जास्तीत जास्त लोकांचा पाठिंबा मिळत असून, शहरी भागातही त्यांची असलेली दमदार छबी, युवा, निर्व्यसनी आणि वकृत्वात, नेतृत्वात कार्यकुशल असलेला नवोन्मुख चेहरा म्हणून मतदारांमध्ये त्यांची ओळख असून विजयाबद्दल आत्मविश्वास वाढत आहे.

संतोष पवार यांच्या प्रामाणिक आणि संघर्षशील प्रवृत्तीमुळे विविध समाजघटक त्यांच्याभोवती एकत्र येत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात विकासाचे नवे अध्याय लिहिले जातील अशी अपेक्षा आहे. या पार्श्वभूमीवर मतदारसंघात संतोष पवार यांच्या विजयाबाबत जोरदार चर्चा सुरू आहे.

# हिंदु जागृत झाला तरच हिंदु राष्ट्र होणार आहे - पंडीत धीरेंद्र शास्त्री

## महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूरच्या संत संमेलनाला मोठी गर्दी




**भाविकांची झुंबड**

संत संमेलन संपल्यानंतर भाविक भक्तांनी मंचावर येवून बागेश्वर बाबा ज्या ठिकाणी बसून प्रवचन दिले त्या आसनाला भक्तीभावाने नतमस्तक होण्यासाठी झुंबड उडाली होती. भाविकांची अलोट गर्दी कार्यक्रमाला होती.

**बागेश्वर बाबांचे पुन्हा सोलापूरला येण्याचे आश्वासन**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने आयोजित या संत संमेलनाचे नेटके भव्य दिव्य आयोजन आणि सोलापूरकरांची गर्दी प्रतिसाद पाहून बागेश्वर धामचे पंडीत धीरेंद्र कृष्ण शास्त्री भारावून गेले आणि पुन्हा सोलापूरला बोलवा मी येतो असे पुन्हा येण्याचे आश्वासन त्यांनी प्रशांत बडवे, अविनाश महागांवकर यांच्यासह महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरला दिले.

सोलापूर,(कटूसत्य वृत्त):- सनातन हिंदु धमार्तील प्रत्येकजण जागृत झाला तरच हिंदु राष्ट्राची निर्मिती होणार आहे. असे प्रतिपादन बागेश्वर धामचे पीठाधीश पंडीत धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने होम मैदानावर आयोजित संत संमेलनामध्ये धीरेंद्र शास्त्री बोलत होते. जागे व्हा जागे होण्याची वेळ आली आहे. आम्ही इस्लाम विरोधी नाही कोणत्याही धर्माच्या विरोधी नाही परंतु छेडेंगे तो छोडेंगे नही असेही त्यांनी सांगितले. हिंदु धमार्तील सर्वजण एकत्र झाले पाहिजे. भारतभूमी पवित्र आहे आणि या भूमीत हसिनाला आणि सीमालाही सुरक्षित वाटते. महाराष्ट्र ही संताची, महान राष्ट्र भक्तांची आणि छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी आहे. हिंदवी स्वराज्याची निर्मिती ज्यांनी केली ते छत्रपती शिवाजी महाराजही सर्व जाती धर्मांतील लोकांना एकत्र करून रयतेचे राज्य निर्माण केले. तरूणांनी नेहमी आनंदी राहिले पाहिजे घरातून बाहेर निघताना मनात हिंदु राष्ट्राची भावना असली पाहिजे. शरीराने संसारी आणि मनाने सन्याशी असले पाहिजे. प्रत्येक हिंदु जागृत झाला तरच जगामध्ये भारत सर्वश्रेष्ठ होणार आहे असेही आपल्या संतवाणीतून बागेश्वर धामचे पीठाधीश पंडीत धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी सांगितले. या कार्यक्रमाला होम मैदानावर भाविक भक्तांनी मोठ्याप्रमाणात गर्दी केली होती. बागेश्वर बाबांच्या दर्शनासाठी आणि त्यांची एक झलक पाहण्यासाठी तरूणांनीही गर्दी केली होती. काही भाविकांच्या बागेश्वरबाबांनी समस्या जाणून घेतल्या आणि त्यावर उपाय सांगितले.

प्रारंभी स्वरध्यास संगित विद्यालयाच्या वतीने रसिका आणि सानिका कुलकर्णी यांच्याकडून ईश स्तवन, अभंग, कृष्णांची गीते सादर करण्यात आले. नंतर बागेश्वर बाबांचे मंचावर आगमन होताच त्यांचे महिलांकडून औक्षण करण्यात आले. त्यानंतर शंखनाद करून त्यांची सोलापूरातील दाते पंचागकर्ते मोहन दाते यांच्यासह 5 गुरूजींच्या हस्ते पाद्यपुजा करण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, मार्गदर्शक अविनाश महागांवकर, प्रमुख कार्यवाह जितेश कुलकर्णी,कोषाध्यक्ष अमोल धाबळे, प्रसिध्दीप्रमुख विनायक होटकर, नाट्य परिषदेचे जयप्रकाश कुलकर्णी, श्रीपाद येरमाळकर, सुशांत कुलकर्णी, सात्विक बडवे, समर्थ होटकर आदींनी परिश्रम घेतले.

# हुतात्मा एक्सप्रेसला दोन जनरल बोग्या जोडण्यात येणार- खा मोहिते पाटील

**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** गेली पाच वर्षे झाली सोलापूरहून पुण्याला जाणाऱ्या हुतात्मा एक्सप्रेसला जनरल कोच बंद करण्यात आले होते . येत्या दि.२१ नोव्हेंबर पासून पुन्हा हुतात्मा एक्सप्रेसला दोन जनरल कोच सुरू करण्यात येणार असल्या मुळे सर्वसामान्य प्रवाशांनाही आता हुतात्मा गाडीने पुण्याला जाता येणार असल्याची माहिती एक खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिली .

कुर्डु ता. माढा या गावी आल्या नंतर त्यांनी पत्रकारांशी अनौपचारिक रित्या बोलताना ही माहित दिली पाच वर्षांपूर्वी हुतात्मा एक्सप्रेसला दोन जनरल कोच होते यामुळे कोणीही प्रवासी पुण्याला जाताना व येताना या गाडीने प्रवास करू शकत होता यामुळे मोठ्या संख्येने प्रवासी रेल्वेचे रिझर्वेशन नसले तरी पुण्याला अगदी आरामात जाऊ शकत होते .

यामुळे रेल्वेला मोठी गर्दी कायम असायची तसेच रेल्वेचे उत्पन्नही वाढले होते . इतर गाड्यांना पुण्याला जाताना रिझर्वेशन असायचे तेथे टीसीचा त्रास व्हायचा यामुळे प्रवासी हुतात्मा एक्सप्रेसला प्राधान्य द्यायचे .

भारतात कोविड पसरल्या नंतर अनेक रेल्वे गाड्या बंद झाल्या यातील काहींची रचना बदली त्यातच हुतात्मा एक्सप्रेसचे दोन जनरल कोच बंद करण्यात आले होते . यामुळे सोलापूर तसेच कुडुर्वाडी येथील प्रवाशांना पुण्याला जाण्या साठी व येताना हुतात्मा एक्सप्रेसचे रिजर्वेशन करावे लागायचे ज्यांना रिझर्वेशन आहे त्यांनाच डब्यामध्ये प्रवेश मिळत असे . इतर प्रवाशांना टीसी दंड करायचे त्यामुळे सर्वसामान्य प्रवासी या रेल्वेने प्रवास करू शकत नव्हते .

गेली पाच वर्षे झाली सर्वसामान्य प्रवाशांना या गाडीत प्रवेश मिळणे शक्य नव्हते . सोलापूर रेल्वे विभागाचे डी आर एम नीरज कुमार डोहरे वाणिज्य प्रबंधक योगेश पाटील तसेच खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या उपस्थितीमध्ये सोलापूर येथे बैठक झाली या बैठकीला रेल्वेच्या सर्व विभागाचे प्रमुख सदस्य पत्रकार विनायक पाटील सागर शर्मा उपस्थित होते . यावेळी रेल्वेच्या प्रवाशांच्या मागणीचा विचार करून खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी हुतात्मा एक्सप्रेस मधे सर्वसामान्य प्रवाशांनाही साधारण तिकीटावर प्रवास करण्यासाठी संधी मिळावी अशी मागणी केली .

रेल्वे विभागाच्या वतीने मध्य रेल्वेचे मुख्य प्रबंधक यांना या बाबतची मागणी केली गेली . सध्याच्या हुतात्मा गाडीला दोन जागा डबे जोडले तर पुणे येथील प्लॅटफॉर्म अपुरा पडत होता . यामुळे प्रवाशांची ही मागणी पूर्ण होऊ शकत नव्हती . वाणिज्य प्रबंधक योगेश पाटील यांनी सतत वरिष्ठ कार्यालयाशी पाठपुराव करून शेवटी याच गाडीतील दोन डबे जनरलचे करण्यात आलेले आहेत . यामुळे हुतात्मा गाडीमध्ये कोणीही आता पुण्याला जाताना येताना सामान्य तिकीट काढून प्रवास करू शकणार आहे यामुळे प्रवाशांना पुण्याला जाताना व येताना वेगात प्रवास करण्याचा तसेच इतर गाडीतील टी सी च्या त्रासापासून सुटका मिळणार आहे यामुळे प्रवासी वगार्तून आनंद व्यक्त होत आहे .

# हद्दवाढ भागातील सर्व समस्या मार्गी लावू : अमर पाटील



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** परिसरात पदयात्रा काढली. या हद्दवाढ भागात अनेक समस्या आहेत. येथील लोकप्रतिनिधींनी कोणताही विकास केला नाही. आता एकदा आपल्याला संधी द्यावी आपण हद्दवाढ भागातील सर्व समस्या मार्गी लावू,असे आवाहन दक्षिण विधानसभा मतदारसंघातील ठाकरे गटाचे उमेदवार अमर पाटील यांनी केले.अमर पाटील यांनी नीलमनगर, कोटणीस नगर,द्वारकानगर, माशालवस्ती, ग्रीन युनिटी पार्क, पंचमुखी गणपती,पाटील नगर, कित्तूर चनम्मा नगर, अनुपमा पार्क, विवेकानंद नगर २, सर्वेश नगर, सैफूल वेळी शेकडो महिलांनी औक्षण करून शुभेच्छा आणि आशीर्वाद दिले.

पदयात्रेत नागरिकांनी समस्या सांगितल्या. खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डे हे कळ नाही, पाण्यासाठी आक्रोश,रोड रोमिओचा भगिनींना होणारा त्रास अशा शेकडो समस्यांचा पाढा विजापूर रोड भागातील नागरिकांनी वाचला. अमर पाटील म्हणाले, या समस्या सोडवता येतील.

त्यासाठी नियोजन करू. हे विषय आगामी सहा महिन्यात मार्गी लावू अशी ग्वाही पाटील यांनी दिली.या दौऱ्यात नागरिकांनी अमर पाटील यांच्याप्रती असलेला विश्वास व्यक्त केला.

# दक्षिण सोलापूरच्या विकासासाठी कटीबद्ध : राठोड



**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** मांडली. आज काही अपक्ष उमेदवार युवराज राठोड यांनी मंगळवारी भंडारकवठे, बाळगी, तेळगाव, सादेपूर, लवंगी, बाळकोटा गावात पदयात्रा काढली. झाली. आजी

माजी आमदारांची ही गावे मात्र आजही विकासापासून वंचित राहिली आहेत. आता ती कसर

आपण भरू काढू, दक्षिण सोलापूरच्या विकासासाठी कटीबद्ध असल्याचे यावेळी राठोड यांनी सांगितले.गावातील नागरिकांनी राठोड यांना भेटून आपली कैफियत उभे आहेत. ते कोणाची बी टीम आहेत आणि कोणाच्या मदतीवर उभे आहेत, याची आम्हाला जाण आहे. मात्र युवराज राठोड हे जनतेच्या भल्यासाठी निवडणूक लढवत आहेत, त्यांनाच सहकार्य करायचे असा निर्धार गावकऱ्यांनी केला. आजी माजी आमदारांनी या मतदाराचा वापर केला. या भागाचा विकास मी करून दाखवेन आणि जनतेला तक्रार करण्याची संधी मिळणार नाही अशी ग्वाही राठोड यांनी दिली.